# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

## (पोलीस वार्तापत्र)

## सायंकाळ

---

### दिनांक 16.09.2020 बुधवार

### (गुन्हे)

**1) पो.स्टे. सिताबर्डी – फसवणुक :**

दिनांक 30.08.2020 ते दिनांक 01.09.2020 रोजी दरम्यान पो.स्टे सिताबर्डी हद्दीत राहणारे 50 वर्षीय फिर्यादी हे घरी हजर असतांना आरोपी क्र. 1) प्रकाश शेट्टी, 2) भिमेश्वर, 3) प्रविण कुमार, यांनी आर्मी ऑफीसर असल्याचे सांगुन फेसबुकवर गाडी विकण्याची जाहिरात दिली असता फिर्यादीने त्यांच्या सोबत संपर्क केला असता आरोपीतांनी वेगवेगळया कारणासाठी फिर्यादीकडुन ऑनलाईन बॅकींगव्दारे 6,00,500 रू घेवुन गाडी न देता फिर्यादीची फसवणुक केली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे सिताबर्डी येथे सपोनि मोहीते, 9423482325 यांनी कलम 420 भादवि सह कलम 66(ड) आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**2) पो.स्टे एमआयडीसी – पळवुन नेणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दिनांक 15.09.2020 चे 2300 वा चे सुमारास पो.स्टे एमआयडीसी हद्दीत राहणा–या फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला एका अनोळखी इसमाने फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतुन फुस लावुन पळवुन नेले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार पो.स्टे एमआयडीसी येथे पोउपनि बघमारे, 9890201861 यांनी आरोपीविरूध्द कलम 363 भादवि अन्वये गुन्हा नोदविला आहे.

### (अकस्मात मृत्यू)

**पो.स्टे. हुडकेश्वर, नंदनवन, कळमना, कपीलनगर, कोतवाली, गणेशपेठ :**

**1) हुडकेश्वर** – दिनांक 16.09.2020 चे 1000 वा चे सुमारास पो.स्टे हुडकेश्वर हद्दीत प्लॉट नं. 89,90 गजानन नगर पीपळा रोड, नागपुर येथे राहणारे सुरज रमेश आसोले, वय 30 वर्ष, याने आपले राहते घरी सिलींग फॅनला दुपट्टयाचे सहायाने गळफास लावुन आत्महत्या केली. याप्रकरणी फिर्यादी अभिलेष अरविंद गोमोस, वय 22 वर्ष, रा. संत गजानन नगर प्लॉट नं. 93 नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे हुडकेश्वर येथे पोहवा रमेश विंचुरकर, 9923478314 यांनी अकस्मात मृत्युची नोद केली आहे.

**2) नंदनवन** – दिनांक 16.09.2020 चे 0900 वा ते 1100 वा दरम्यान पो.स्टे नंदनवन हद्दीत प्लॉट नं. 34 मिरे ले आउट, नागपुर येथे राहणारे राजेश धनराज लताळ, वय 28 वर्ष, याने आपले राहते घरी सिलींग फॅनला गुलाबी रंगाचे दुपट्टयाचे सहायाने गळफास लावुन आत्महत्या केली. याप्रकरणी फिर्यादी राहुल सुरेश पडोळे, वय 28 वर्ष, रा. प्लॉट नं. 18 मिरे ले आउट, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे नंदनवन येथे पोउपनि भवाळ, 9922995726 यांनी अकस्मात मृत्युची नोद केली आहे.

**3) कळमना** – दिनांक 15.09.2020 चे 1530 वा पुर्वी महेन्द्र प्रताप ठाकुर, वय 50 वर्ष रा. अकवा, त. बक्तीआय, जि. मधुबनी (बिहार) ह.मु पो.स्टे कळमना हद्दीत सदगुरू दालमिल ॲग्रो शिक्षक कॉलोनी, कळमना, नागपुर येथे बेशुध्द अवस्थेत मिळुण आले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी फिर्यादी उमेश जगन्नाथ मोदने, वय 50 वर्ष,

रा. गौरीशंकर नगर, प्लॉट नं. 152 भरतवाडा रोड, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे कळमना येथे पोहवा योगेन्द्र परमार, 9325457478 यांनी अकस्मात मृत्युची नोद केलीं आहे.

4) कपीलनगर – दिनांक 15.09.2020 चे 2345 वा ते दिनांक 16.09.2020 चे 0600 वा दरम्यान पो.स्टे कपीलनगर हद्दीत म्हाडा क्वॉर्टर बिल्डींग नं. 61 क्वॉ. नं. 950 नागपुर येथे राहणारे योगेश नरेन्द्र मोहोड, वय 30 वर्ष याने आपले राहते घरी सिलींग फॅनला काळया, गुलाबी रंगाचे साडीने गळफास लावुन आत्महत्या केली. याप्रकरणी फिर्यादी गं.भा. सहजा नरेन्द्र मोहोड, वय 50 वर्ष यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे कपीलनगर येथे सपोउपनि संजय, 7972317247 यांनी अकस्मात मृत्युची नोद केली आहे.

5) कोतवाली – दिनांक 15.09.2020 चे 1130 वा चे सुमारास पो.स्टे कोतवाली हद्दीत नबाबपुरा, नागपुर येथे राहणारे रविकांत भास्करराव नवलाखे वय 35 वर्ष, याची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 15.09.2020 चे 1500 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे कोतवाली येथे पोउपनि लाकडे, 9823982957 यांनी अकस्मात मृत्युची नोद केली आहे.

6) गणेशपेठ – दिनांक 16.09.2020 चे 1030 वा चे सुमारास अंदाजे 30 ते 35 वर्ष वयोगटातील एक अनोळखी पुरूष इसमाचे प्रेत पो.स्टे गणेशपेठ हद्दीत गांधीसागर तलावाचे पाण्यात रमन सायन्स समोर तरंगतांना मिळुण आले. याप्रकरणी फिर्यादी जगदीष रमेश खरे, वय 45 वर्ष, रा. काशीबाई देउळ, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे गणेशपेठ येथे मसपोनि व्ही.डी. वडस्कर, 9158701689 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

## (ईतर)

**1) नागपुर शहर पोलीसांकडुन विना मास्क फिरणा–या नागरीकांवर कारवाई :**

नागपुर शहरात कोराना विषाणुचा प्रादुर्भाव व प्रसार झपाटयाने वाढल्याने त्यास प्रतिबंध करण्याकरीता मा. पोलीस आयुक्त, श्री अमितेश कुमार, यांचे मार्गदर्शनाखाली नागपुर शहरातील सर्व पोलीस स्टेशन व वाहतुक शाखेमार्फत आज विना मास्क फिरणा–या व्यक्तींवर तसेच वाहतुकीच्या इतर कलमान्वये कारवाई करण्यात आली.

सदर करण्यात आलेली कारवाई ही एका दिवसातील सर्वोच्च अशी कारवाई आहे. तरी सर्व नागपुरकर नागरींकाना आवाहन करण्यात येते की सार्वजनीक ठिकाणी वाहतुक करतांना किंवा वावरतांना तोंडाला मास्क लावावा, सॅनिटायझरचा वापर करावा तसेच सुरक्षित सामाजिक अंतर ठेवावे व नागपुर पोलीसांना सहकार्य करून स्वतःवर होणारी कारवाई टाळावी. (सदरची कारवाई सायंकाळी 0600 वा पर्यत ची आहे)

| | केसेस | दंड |
|---|---|---|
| पोलीस स्टेशन | 368 | 1,27,100 |
| वाहतुक विभाग | 51 | 10,200 |
| एकुण | 419 | 1,37,300 |

**2) कुख्यात गुंड व धोकादायक व्यक्ती शेख वसिम उर्फ चि–या वल्द शेख अफजल, महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हीडीयो पायरेटस्, वाळु तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणा–या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे संबंधी अधिनियम सन् 1981 (सुधारणा 2015 चे) (महा. एल.व्ही. 1981) अंतर्गत स्थानबध्द :**

नागपुर शहराचे पोलीस आयुक्त यांनी दिनांक 15/09/2020 रोजी जारी केलेल्या आदेशान्वये पोलीस ठाणे तहसिल व शांतीनगर, नागपूर चे हद्दीत शरीराविरूध्द व मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारा कुख्यात गुंड नामे शेख वसिम उर्फ चि–या वल्द शेख अफजल, वय 23 वर्ष रा. शांतीनगर घाटाजवळ, पो.स्टे. शांतीनगर, नागपूर शहर यास महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हीडीयो पायरेटस्, वाळु तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणा–या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे संबंधी अधिनियम सन् 1981 (सुधारणा 2015 चे) (महा. एल.व्ही. 1981) अंतर्गत दिनांक 15/09/2020 रोजी स्थानबध्द करून नागपूर मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे.

वसिम उर्फ चि–या वल्द शेख अफजल, याने खुन करणे, खुन करण्याचा प्रयत्न करणे, खंडणी, दुखापत करण्याचे भय दाखवुन खंडणी वसुल करणे, जिवे मारण्याची किंवा गंभीर दुखापत करण्याची भिती घालुन खंडणी वसुल करणे, गैरकायेदशीर मंडळीचा सदस्य असणे, दंगा करणे, प्राणघातक औजाराने दंगा करणे, आपखुशीने प्राणघातक औजाराने गंभीर दुखापत करणे, नुकसान करणे, आपखुशीने दुखापत करणे, शांतता भंग करण्याचे उद्देशाने जाणिवपुर्वक अपमान करणे, अश्लील कृत्य तथा गाणी गाणे, अपराधीक कट रचणे, अपराधीक धमकी देणे,ए अग्नीशस्त्र जवळ बाळगणे, प्राणघातक औजार घेवुन फिरणे, मनाई आदेशाचे उल्लंघन करणे ईत्यादी सारखे मालमत्तेविरूध्द तसेच शरीराविरूध्द गंभीर स्वरूपाचे अपराध केलेले आहे.

सदर स्थानबध्द इसमाविरूध्द सन 2012 मध्ये स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली होती, तसेच सन 2015 मध्ये त्याचेविरुद्ध मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली होती त्यानंतर सन 2018, 2019 व सन 2020 मध्ये कलम 110(ई,ग) सीआरपीसी अन्वये तीन वेळा प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु त्याचेवर केलेल्या प्रतिबंधक कारवाईचा कोणताही परिणाम झाला नाही. याउलट त्याने आपले गैरकायदेशीर व धोकादायक गुन्हे करण्याची प्रवृत्ती निरंतर सुरूच ठेवुन त्याने लगतच्या काळात पो.स्टे. तहसिल चे हददीत खुन करण्याचा प्रयत्न हा अतिशय गंभीर स्वरूपाचा गुन्हा केला.

यातील दिनांक 16/03/2020 रोजी फिर्यादी इसम हा त्याचे घराबाहेर उभा असताना, वसिम शेख हा त्याचे 20 ते 25 साथीदारांसह पिस्तुल, कोयता व लाठी अशा शस्त्रानिशी फिर्यादी चे जवळ जावून त्यास जिवे ठार मारण्याची धमकी दिली त्यामुळे घाबरुन फिर्यादी तेथून पळाल्याने वसिम चि–या यांने फिर्यादी चा पाठलाग करुन फिर्यादीवर बंदुकीची गोळी झाडली परंतु त्याचा नेम चुकल्याने फिर्यादी थोडक्यात बचावला अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पो.स्टे तहसिल येथे अप क्र. 136/2020 u/s 307, 108, 115, 143, 147, 148, 149, 504, 506, 427, IPC r/w 3/25, 4/25 Arms act अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. तसेच जुलै 2020 मध्ये फिर्यादी हा शांतीनगर हद्दीत संशयास्पद हालचाल करताना मिळून आल्याने त्याचे घराची झाडती घेतली असता धारदार कोयता मिळून आल्याने म्याचेविरुद्ध पोलीस स्टेशन शांतीनगर येथे कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता

अशाप्रकारे धोकादायक व्यक्ती नामे वसिम उर्फ चि–या वल्द शेख अफजल, याचे अपराधीक कृत्ये निरंतर वाढत असल्याने आणि त्यामुळे तो सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहचवित असल्याने श्री. जयेश भांडारकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो.स्टे तहसील यांनी नमुद आरोपीतास स्थानबद्ध करणेकरिता गुन्हे शाखेस अहवाल सादर केला होता. मा. श्री. निलेष भरणे सहपोलीस आयुक्त नागपूर शहर व श्री. गजानन राजमाने, पोलीस उप आयुक्त गुन्हे प्रकटीकरण यांचे मार्गदर्षनाखाली गुन्हेशाखेतील एम.पी.डी.ए. विभागाने नमुद आरोपीला स्थानबध्द करण्याकरीता प्रस्ताव सादर केला त्याअन्वये स्थानबध्द प्राधिकारी मा. श्री.अमितेष कुमार, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी दिनांक 15/09/2020 रोजी त्याचे विरूध्द स्थानबध्दतेची महत्वपुर्ण कारवाई केलेली आहे व त्यास नाशिक मध्यवर्ती कारागृह, नाशिक येथे स्थानबध्द करण्याचा आदेश पारीत केला आहे.



**3) गुन्हे शाखा युनिट क्रं. 4 ची कारवाई :**

गुन्हे शाखा युनिट क्रमांक 04, नागपूर शहर चे प्रभारी श्री अशोक मेश्राम यांचे सह युनिट पथकातील सपोनि किरण चौगले व स्टाफ दिनांक 16/06/2020 रोजी आरोपीतांचे शोधात विशेषगस्त करीत असता दिनांक 16.09.2020 रोजी वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री अशोक मेश्राम यांना त्यांचे गुप्त माहीतीदारामार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, पो.स्टे शांतीनगर हददीत दिनेश किराणा स्टोर्स समोर सार्वजनीक ठिकाणी, मुदलीयार लेआउट, नुरजहा बेगम यांचे घराचे बाजूला, शांतीनगर, नागपूर येथे आरोपी अब्दुल लतीफ अब्दुल रज्जाक 44 वर्षे रा. शांतीनगर, बांगडे प्लॉट मज्जीद चे बाजूला, बब्बूबावा

सवारी वाले यांचे घरी किरायाने, पो.स्टे शांतीनगर, नागपूर शहर हा त्याचे ताब्यात प्राणघातक शस्त्र बाळगून आहे. अश्या मिळालेले माहीतीचे ठिकाणी सापळा रचून कारवाई केली असता यातील आरोपी अब्दुल लतीफ अब्दुल रज्जाक हा पोलीसांना पाहून पळू लागला व काही अंतरावरच उभी असलेले हुंडाई सेंट्रो कारने पळून जाण्याचे बेतात असतांना लगेच पोलीस पथकाने सदर आरोपीचा पाठलाग करून त्यास सेंट्रोकारसह ताब्यात घेतले. आरोपीची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता. आरोपीताजवळून एक प्राणघातक हत्यार, एक मोबाईल व हयुंडाई सेंट्रो कार क्रमांक एमएच/31/एएच/6461 असा एकूण 1,15,100 रू चा मुददेमाल जप्त केला. सदर आरोपीने त्याचे ताब्यात प्राणघातक शस्त्र बाळगुन त्याचे कृत्य कलम 4,25 भा.ह.कायदा सहकलम 135 महा.पो.कायदा अन्वये गुन्हा होत असल्याने आरोपीतास पुढील कारवाई करीता ताब्यात घेतले. सदर आरोपीचा गुन्हे अभिलेख पडताळला असता आरोपीवर नागपूर शहरातील विविध पोलीस स्टेशनला घरफोडी, दंगा, खंडणी, अपहरण, दारू, एनडीपीएस, असे एकूण 21 गंभीर गुन्हे  दाखल आहेत.

नमूद आरोपी स–हाईत गुन्हेगार असल्याने त्याचेकडे अधिक व सखोल चौकशी केली असता दिनांक 20/08/2017 रोजी पो.स्टे एम आय डी सी, लातूर हददीमध्ये सदर आरोपीताने त्याचे ईतर 10 आरोपीतांसोबत संगणमत करून, पोलीस असल्याची बतावणी करून, फिर्यादीचे अपहरण करून, त्यास जबर दुखापत करून, दरोडा टाकूण 30 लाख रू जबरीने हिसकावले आहे. याबाबत पोलीस स्टेशन एम. आय.डी.सी,लातूर येथे अपराध क्रमांक 276/2017 कलम 394,395,365,170,120ब, भादवि प्रमाणे दाखल असून त्यामध्ये सदर आरोपी हा जा.फौ कलम 299 प्रमाणे मागील 04 वर्षांपासून फरार असून सदर गुन्हयातील ईतर आरोपीतांना मा. न्यायालयातून 3 वर्ष शिक्षा झाल्याचे निदर्शनात आले आहे.

अश्याप्रकारे सदर पथकाने मागील 03 वर्षांपासून दरोडयाचे गुन्हयात फरार असलेले आरोपीतास पकडून त्याचे मुसक्या बांधून प्रशंसनीय कामगीरी केली आहे.

सदरची कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ. श्री. निलेश भरणे, मा. पोलीस उपायुक्त (डिटेक्शन) श्री. गजानन शिवलींग राजमाने, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री अशोक मेश्राम, सपोनि किरण चौगले,  नापोशि आशिष क्षिरसागर, सचिन तुमसरे वाहन चालक पोहवा दिपक झाडे यांनी केली आहे.

**4) पो.स्टे तहसिल पोलीसांची कामगीरी :**

दिनांक 25.12.2017 रोजी रात्री 2230 वा दरम्‍यान फिर्यादी फिरोज खान वल्द मोहम्मद जाबीर खान, वय 34 वर्ष रा. गरीब नवाज मस्जीद जवळ, अनवर किराणा मागे तहसिल, नागपुर हा आपला भासा जक्की व मित्र शईदभाई सोबत अनवर किराणा दुकाना समोर उभा असतांना आरोपी ईरफान उर्फ इप्पा पिर मोहम्मद, ईरसाद खान उर्फ ईच्चु पिर मोहम्मद, नौशाद खान पिर मोहम्मद, ईम्म काल्या हे सदर ठीकाणी येवुन फिर्यादी फिरोज यास म्हटले की, तु हमारी तरफ ऑख उठाकर देखता है. हमारी बात नही सुनता है असे म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली व आरोपी ईप्पा व नौशाद यांनी आरोपी ईम्मु काल्या यास फिर्यादीस जिवाने ठार मारण्यास सांगीतले, त्यावरून आरोपी ईम्मु काल्याने फिर्यादी फिरोज यास जिवाने ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादीचे उजव्या हातावर तलवार मारून जखमी केले व जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीचे रिपोर्ट व मेडीकल अहवाल वरून कलम 307, 506(ब), 34 भादवि सह कलम 4, 25 भाहका अन्वये गुन्हा नोंदविला होता.

सदर गुन्हा दाखल झाला तेव्हा पासुन आज पावेतो गुन्हयात पाहीजे आरोपी नामे इरशाद उर्फ इच्छु वल्द पिर मोहम्मद खान वय 32 वर्ष रा. डोबीनगर, मोमीणपुरा, नागपुर हा गुन्हयात फरार होता. त्याचा आज पावेतो वेळो वेळी तसेच वेगवेगळया मार्गाने वेशान्तर करून शोध घेतले असता तो मिळुण आला नाही तरी त्याचे बाबत आज रोजी खात्रीशिर माहिती मिळाली की तो डोबीनगर झोपडपट्टीत लपुन बसला आहे त्यावरून त्याचा शोध घेणे करीता कौशल्यपुर्ण योजना तयार करण्यात आली त्यानुसार डोबीनगर झोपडपट्टी मध्ये संशईत घराची झडती घेतली असता ईरशाद उर्फ ईच्छु हा पाहीजे आरोपी हा मिळुण आल्याने त्यास ताब्यात घेवुन पुढील कारवाई करीता पो.स्टे येथे आणण्यात आले.

सदरची कारवाई मा.श्री राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त, परी. क्रं. 3, नागपुर शहर मा. श्री गजानन शिवलींग राजमाने, (डिटेक्शन), यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि जयेश भांडारकर, दुपोनि दिलीप सागर, पोउपनि स्वप्नील वाघ, प्रशांत राठोड, सपोउपनि संजय दुबे, पोहवा प्रमोद शनिवारे, नापोशि सुनिल ठाकुर, संजय मिश्रा, पोशि शम्भुंसिंग किरार, मनिष रामटेके, सुरज ठाकुर, क्रिष्णा चव्हाण, पुरूषोत्तम जगनाडे, रंजीत बावणे, किशोर गरवारे, नझिर शेख, गगण यादव, नितीन राठोड, विकास

यादव, मपोशि ज्योती शर्मा, प्रतिभा, सर्व पो.स्टे तहसिल व पोहवा राजेद्रं चिमोटे, नापोशि हेंमत लोणारे, पोशि अंकुश चौधरी, सर्व पो.स्टे गणेशपेठ, तसेच पोहवा वामन ठोबंरे, नापोशि प्रकाश सुरजुसे, पकंज बांदरे, सर्व पोस्टे कोतवाली नागपुर शहर यांनी केली आहे.



5) शहरातील नाईट राऊंड अधिकारी बाबत :–

नागपूर शहरात आज दिनांक 16.09.2020 रोजी मा. पोलीस उप आयुक्त, (परि.क्रं. 2) श्रीमती विनीता साहु, या नाईट राऊंड करणार आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर